नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०२/२०२५ (शुक्रवार) संध्याकाळ**

---

## चोरी चा गुन्हा उघड , बेला पोलीसांची कार्यवाही

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक ०५/०२/२०२५ रोजी पोलीस स्टेशन बेला येथे फिर्यादी नामे अविनाश महादेवराव निखार, वय ५० वर्ष, रा. वार्ड क सिर्सी ता. उमरेड, जि. नागपुर यांनी रिपोर्ट दिली की, मौजा सिर्सी येथील फिर्यादी चे राहते घरातुन कोणीतरी अज्ञात आरोपीने सोन्याचे दागिने आणि ३०,००० रूपये रोख असा एकुण ७०,०००/— रूपायचा माल चोरून नेला आहे. अशा रिपोर्ट वरून कलम ३०५(अ) भा.न्या.स. कायदा अन्वये अज्ञात आरोपी विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

बेला पोलीसांनी तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू करत आरोपीचा शोध घेत असतांना गुप्तबातमीदाराच्या खबरे वरून आरोपीचा शोध घेऊन ओरोपी नामे हर्ष अविनाश निखार आरोपीस अटक करण्यात आली आहेत. आरोपीच्या ताब्यातुन **सोन्याचे दागिने आणि ३०,००० रूपये रोख असा एकुण ७०,०००/— रूपायचा असा संपुर्ण मुददेमाल जप्त करण्यात आला आहे**. सदर आरोपी हा मुळचा मौजा सिर्सी येथील रहिवासी आहेत तसेच त्याने ऑनलाईन गेम मध्ये पैसे हरल्यामुळे चोरी केल्याचे माहीती प्राप्त झाली आहे. पुढील तपास बेला पोलीस करीत आहेत.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर